आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२० जून २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज ओडिशा दौऱ्यावर/ ४७ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या विकासकामांचं करणार उद्घाटन आणि पायाभरणी

- नीट यूजी २०२६ फेरपरीक्षेच्या पार्श्वभूमीवर देशभरात सुरक्षेचं मॉक ड्रील / गैरप्रकार रोखण्यासाठी प्रशासनातर्फे विविध उपाययोजना

- आंतरराष्ट्रीय योगदिनाचा मुख्य कार्यक्रम उद्या कोलकात्यात प्रधानमंत्र्याच्या उपस्थितीत होणार

आणि

- भारत विरुद्ध अफगाणिस्तान एकदिवसीय क्रिकेट मालिकेतला तिसरा सामना चेन्नईत सुरु/ नाणेफेक जिंकून अफगाणिस्तानचा प्रथम फलंदाजीचा निर्णय

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज ओडिशा राज्याच्या दौऱ्यावर आहेत. राष्ट्रपती आज ओडिशातल्या मयूरभंज जिल्ह्यातल्या पहाडपूर या त्यांच्या मूळ गावी पोहोचल्या आहेत. मुर्मू त्यांच्या ६८ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. ओडिशा सरकारच्या दोन वर्षांच्या कार्यकाळानिमित्तानं आयोजित एका सार्वजनिक कार्यक्रमात राष्ट्रपती आणि प्रधानमंत्री सहभागी होणार आहेत. ऊर्जा, पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा, शिक्षण आणि सिंचन यासारख्या क्षेत्रांमधल्या एकूण ४७ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक विकासकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी त्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी प्रधानमंत्री जनसभेला संबोधित करतील.

दरम्यान, प्रधानमंत्री आज पश्चिम बंगालच्या हुगळी जिल्ह्यातल्या तारकेश्वर इथं होणाऱ्या 'पश्चिम बंगाल दिवस' सोहळ्यात सहभागी होणार असून विविध विकासकामांचं उद्घाटन, लोकार्पण आणि पायाभरणी यावेळी करणार आहेत.

**<><><><><>**

१२वा ‘आंतरराष्ट्रीय योग दिवस’ उद्या साजरा होणार आहे. ‘निरोगी वयोवृद्धीसाठी योग’ अशी यंदाच्या योगदिनाची संकल्पना असून जगभरात सुमारे अडीच हजार ठिकाणी विविध संस्था संघटनांतर्फे योगविषयक कार्यक्रम होणार आहेत.  २१० पेक्षा जास्त इंडियन मिशन्सच्या पुढाकारातून हे कार्यक्रम होणार आहेत. उद्या योगदिनाचा मुख्य कार्यक्रम कोलकात्याच्या ऐतिहासिक रेड रोडवर होणार असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी त्यात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाचं थेट प्रसारण सकाळी साडे सहा वाजल्यापासून आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून केलं जाणार आहे. त्यामुळे पुणे तसंच छत्रपती संभाजीनगर केंद्रावरून प्रसारित होणारं 'प्रादेशिक बातमीपत्र' या कार्यक्रमाच्या थेट प्रसारणानंतर प्रसारित करण्यात येईल.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू  उद्या मध्य प्रदेशात जबलपूर इथं आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांचा आज ६८ वा वाढदिवस आहे. यानिमित्त त्या आपल्या वडिलांच्या गावी ओदिशातल्या मयूरभंज जिल्ह्यातल्या पहाडपूर इथं आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही आज पहाडपूर इथं पोहोचून मुर्मु यांच्यासह त्यांच्या गावाचा दौरा केला आणि विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला. तत्पूर्वी मोदी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. मुर्मु यांची साधी राहणी, विनम्रता आणि सेवाभाव देशवासियांना प्रेरित करत राहील, अशा शब्दांत प्रधानमंत्री मोदी यांनी मुर्मू यांच्याविषयी समाजमाध्यमांवरील पोस्टमध्ये गौरवोद्गार व्यक्त केले.

दरम्यान, ओदिशा सरकारला दोन वर्षे पूर्ण होत असल्यानिमित्तानं एका जाहीर कार्यक्रमातही राष्ट्रपती आणि प्रधानमंत्री उपस्थित राहणार आहेत. यावेळी ४७ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विकास कामांचं लोकार्पण होणार आहे.

**<><><><><>**

'पश्चिम बंगाल दिन’, हा दिवस, भारताचा अविभाज्य भाग म्हणून राहण्याच्या पश्चिम बंगालच्या संकल्पाचं प्रतीक आहे, अशा शब्दात **राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू यांनी प्रसार माध्यमांद्वारे 'पश्चिम बंगाल दिवसा’ निमित्त राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या. **उपराष्ट्रपती** सी. पी.

राधाकृष्णन तसंच **गृहमंत्री** अमित शहा यांनी पश्चिम बंगालमधल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

बँका, मालमत्ता क्षेत्रातील कंपन्या आणि कर्जदार यांच्यातल्या संगनमताबाबत सर्वोच्च न्यायालयानं तीव्र चिंता व्यक्त केली आहे. कर्ज थकबाकीच्या प्रकरणांमध्ये होत असलेल्या तडजोडीविषयी न्यायालयानं प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. करदात्यांकडून जमा झालेला सार्वजनिक निधी बँकांकडून कर्ज स्वरूपात दिला जातो मात्र त्याच्या वसूलीसाठी आवश्यक प्रयत्न केले जात नसल्याचं निरीक्षण सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती व्ही मोहन यांच्या पीठानं नोंदवलं. लोकांच्या कल्याणासाठी खर्च होणं आवश्यक असलेल्या सार्वजनिक निधीचा गैरवापर होत असल्याबद्दल न्यायालयानं चिंता व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

नीट यूजी २०२६ फेरपरीक्षा उद्या होणार असून याची पूर्वतयारी म्हणून आज एनटीए नं देशभरात मॉक ड्रील आयोजित केलं. परीक्षा पारदर्शक, सुरक्षित आणि सुरळीत व्हावी यासाठीच्या तयारीचा हा भाग आहे. या पार्श्वभूमीवर नवी  दिल्लीत एनटीएच्या मुख्य कार्यालयाबाहेरची सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. नीट यूजी फेरपरीक्षेच्या तयारीविषयी अधिक  जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**------------व्हीसी---------------**

*(उद्या होणाऱ्या नीट यूजी फेरपरीक्षेसाठीची तयारी पूर्ण झाल्याचं एनटीए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं म्हटलं आहे. देशातल्या ५५१ आणि परदेशातल्या १४ शहरांमधे ही परीक्षा होणार आहे. २२ लाख ७९ हजार पेक्षा जास्त विद्यार्थी ही परीक्षा देणार असल्याचं एनटीएनं सांगितलं. परीक्षा पारदर्शक आणि सुरक्षित वातावरणात व्हावी यासाठी पोलीस, प्रशासकीय कर्मचारी, निरीक्षक आदी दोन लाख कर्मचारी देशभरातल्या परीक्षा केंद्रावर तैनात करण्यात आले आहेत. तसंच प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत, विद्यार्थ्यांची ओळख पटवण्यासाठी आधार कार्ड आधारित बायोमेट्रिक बसवले आहेत, प्रश्नपत्रिका तसंच परीक्षेच्या इतर साहित्याची ने आण करण्यासाठी जीपीएस बसवलेल्या पोलिसांच्या वाहनांची सोय करण्यात आल्याचंही एनटीएने सांगितलं. परीक्षा केंद्र असलेल्या जिल्ह्यांमधे कठोर उपाययोजना करण्यात  आल्या आहेत. परीक्षेवर देखरेख करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात*

*दंडाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली आहे. देहरादूनमधे परीक्षेच्या दिवशी गर्दी जमवण्यावर बंदी घालण्यात आली आहे, तसंच परीक्षा केंद्राच्या दोनशे मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ नुसार कठोर प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. अनेक जिल्ह्यांमधे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर पोहोचण्यासाठी प्रशासनातर्फे वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे.*

*नीट यूजी फेरपरीक्षा उद्या दुपारी २ ते सव्वा पाच दरम्यान होईल. यासाठी विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर सकाळी अकरा ते साडे अकराच्या सुमारास हजर व्हावं, असं एनटीएने सांगितलं आहे.*

*दरम्यान, नीट परीक्षेदरम्यान पेपरफुटीसारखे गैरप्रकार रोखण्यासाठी टेलिग्राम वर तात्पुरती बंदी घालण्याचा केंद्र सरकारचा निर्णय दिल्ली उच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे. टेलिग्रामच्या माध्यमातून गैरप्रकार झाल्याचं आढळलं असून याआधीच्या उपाययोजनांमुळे ते रोखता आले नाहीत, त्यामुळे ही बंदी योग्य असल्याचं न्यायालयाने म्हटलं आहे.)*

**<><><><><>**

उद्या होणाऱ्या नीट-यूजी फेरपरीक्षेसाठी नागपूर इथल्या एका विद्यार्थ्याला अबुधाबी इथे परीक्षा केंद्र देण्यात आल्याची बातमी प्रसारमाध्यमांमधे प्रकाशित झाली होती. याची एनटीएने तातडीने दखल घेत हा प्रश्न सोडवला, या विद्यार्थ्याला नागपूर इथंच परीक्षा केंद्र दिल्याचं एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातल्या एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतला तिसरा आणि अंतिम एकदिवसीय सामना चेन्नईतील एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर सुरु झाला आहे. अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे.

यजमान भारतानं या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतलेली आहे.

**<><><><><>**

भारतीय माहिती सेवेतले सेवानिवृत्त अधिकारी दीपांकर मुखोपाध्याय यांचं काल कोलकाता इथं अल्प आजारानं निधन झालं. ते ७७ वर्षांचे होते. माहिती आणि प्रसारण

खात्याच्या विविध माध्यम कार्यालयांमधे त्यांनी काम केलं होतं. आकाशवाणीचे सिंगापूर प्रतिनिधी म्हणूनही त्यांनी काही काळ काम केलं.

**//<><><><><>//**